विषय: आयुक्तांनी अपिलावर दिलेले आदेश.

## परिपत्रक

क्र. डीपीओ. ११९५/७८/एक मुंबई, १२ एप्रिल १९९६.

कोणत्याही अपिलावर आदेश दिल्यानंतर अपिलावरील आदेशांची तात्काळ अंमलबजावणी अपेक्षित असते. आयुक्तांनी/सचिवांनी अपिलात आदेश दिल्यानंतर बऱ्याच वेळेस असे आदेश अधीक्षक जिल्हाधिकाऱ्यांकडे माहितीसाठी पाठवितात. जिल्हाधिकाऱ्यांच्या कार्यबाहुल्यामुळे आणि त्यांच्याकडे असलेल्या कामाच्या ताणामुळे सर्वसाधारण टपाल पाहून ते जिल्हाधिकाऱ्यांकडून परत यायला बराच वेळ जाण्याचा संभव असतो. त्यामुळे आयुक्तांनी/सचिवांनी दिलेल्या आदेशांची अंमलबजावणी प्रलंबित पडून संबंधित अनुज्ञप्तीधारकांना कारण नसताना त्रास सहन करावा लागतो. किंवा अनुज्ञप्तीधारकांच्या विरुध्द आयुक्तांनी/सचिवांनी आदेश दिले असल्यास काही वेळेस त्यास अनपेक्षित लाभही होतो. वस्तुत: अपिलात आयुक्तांनी/सचिवांनी आदेश दिल्यानंतर त्याची अंमलबजावणी करणे हे अधीक्षक यांचे काम आहे. आयुक्तांचे/सचिवांचे आदेश अंमलबजावणी नंतर किंवा एकाच वेळेस (Simulteneously) जिल्हाधिकाऱ्यांच्या नजरेस आणता येतील. अपिलावर आयुक्तांनी/सचिवांनी दिलेले आदेश हे निम्न न्यायालयीन आदेश आहेत आणि वरील वस्तुस्थिती लक्षात घेता अंमलबजावणीस कोणत्याही प्रकारचा उशीर होऊ नये म्हणून अधीक्षकांनी आयुक्तांच्या/सचिवांच्या अपिलावरील आदेशांची तात्काळ अंमलबजावणी करावी असे आदेश देण्यात येत आहेत.

(सुबोध कुमार)
आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रति

१. सर्व जिल्हाधिकारी, सस्नेह.
२. सर्व विभागीय उप आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क.
३. सर्व उप आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क.
४. सर्व अधीक्षक राज्य उत्पादन शुल्क.
५. अभिलेख शाखा. (५ प्रती)

आर. ११.४.